महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.२-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# सुधारपत्र क्र. ३९ दिनांक २९/ ०९/ २०१८

**(म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम - २००५)**

**विषय :** महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबत.

.....

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पारित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दि. २३.०७.२०१८ च्या धर्तीवर कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालकांनी विचारविनिमय करून ठराव क्र. १४३८ दि. ३०.०८.२०१८ अन्वये कंपनीतील महिला कर्मचारी तसेच पत्नी नसलेले पुरूष वर्गीय कर्मचारी तसेच ज्या कर्मचाऱ्यांची पत्नी असाध्य आजाराने अंथरूणाला खिळलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांस १८० दिवसाच्या कमाल मर्यादेपर्यंत "बाल संगोपन रजा" अंमलात आणण्यास व अनुज्ञेय करण्याबाबत मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र. ४१ (एक) (त) येथे "बाल संगोपन रजा" समाविष्ट करण्यात येत आहे.

३. तसेच म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र. ५३ (ज) खालीलप्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.

**<u>सेवाविनियम क्र. ५३ (ज) : बाल संगोपन रजा</u>**

कंपनीच्या स्थायी व अस्थायी पदांवर कार्यरत महिला व पत्नी नसलेले पुरुष कर्मचारी तसेच ज्या कर्मचाऱ्याची पत्नी असाध्य आजाराने अंथरूणाला खिळलेली आहे असे कर्मचारी बाल संगोपन रजा मिळण्यास पात्र असतील. सदरची रजा खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.

(एक) बाल संगोपन रजा संपूर्ण सेवाकालावधीत १८० दिवस इतक्या कमाल मर्यादेपर्यंत अनुज्ञेय असेल.

(दोन) ज्या कर्मचाऱ्यांची १ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना सदर रजा लागू राहील.

(तीन) मुलांचे वय १८ वर्षे होईपर्यंतच सदर रजा लागू राहील. (बाल संगोपन रजेवर असताना मुलाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यास, त्या दिनांकापासून पुढे सदर रजा लागू होणार नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी, रजा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याची राहील.)

(चार) एका वर्षामध्ये २ महिन्यांच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

(पाच) सदर रजा ही उपरोक्त अट क्र. ४ च्या अधिन राहून सेवा कालावधीत १/२/३/४ टप्प्यात (In Spells) घेता येईल. तथापि, सदर रजा एका कॅलेंडर वर्षात तीन टप्प्यांमध्ये (In Three Spells) घेता येईल.

(सहा) सदरची रजा पहिल्या २ ज्येष्ठतम हयात मुलांकरिता लागू राहील.

(सात) सदरची रजा अर्जित रजा व अर्धवेतनी रजा खात्यावर असली तरी मंजूर करता येईल.

(आठ) सदरची रजा अर्जित रजा, अर्धवेतनी रजा तसेच प्रसुती रजेला जोडून घेता येईल.

(नऊ) एका कॅलेंडर वर्षात घेतलेली रजा पुढील कॅलेंडर वर्षीही सलग असल्यास, ती ज्या कॅलेंडर वर्षात प्रारंभ झाला, त्या कॅलेंडर वर्षातील समजण्यात यावी.

(दहा) बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

(अकरा) परिवीक्षाधीन कालावधीत बालसंगोपन रजा मान्य करता येणार नाही. तथापि, रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास, कर्मचाऱ्याच्या मुलाबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे त्यास रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी खात्री झाल्यास, परिवीक्षाधीन कालावधीतही संबंधितास अपवादात्मक परिस्थितीत, कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा मंजूर करता येईल. त्या प्रमाणात संबंधित महिला/पुरुष कर्मचाऱ्याचा परिवीक्षाधीन कालावधी वाढविला जाईल.

(बारा) सदर रजा कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय असणार नाही.

(तेरा) सदर रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेनेच सदर रजा घेता येईल. बालसंगोपन रजा मंजूर करताना पदनिर्मिती तसेच पदभरती होणार नाही व दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन रजा मंजूर करण्याची जबाबदारी सक्षम अधिकाऱ्याची राहील. संबंधित कर्मचाऱ्याची वारंवार रजा घेण्याची प्रवृत्ती नाही, ही बाब देखील सदर रजा मंजूर करताना विचारात घ्यावी.

(चौदा) कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्विकारत असेल अशा बाबतीत, वेगवेगळया ठिकाणचा कालावधी एकत्रित गणला जाऊन अशा एकूण सेवेच्या कालावधीमध्ये वेगवेगळया ठिकाणी नियुक्ती असली तरी एकंदर १८० दिवस इतकीच बालसंगोपन रजा अनुज्ञेय असेल.

(पंधरा) बालसंगोपन रजेचा हिशोब योग्यरित्या सेवापुस्तकात नोंदविण्यात यावा.

(सोळा) कंपनीच्या ज्या कर्मचाऱ्याची सेवा किमान दहा वर्षे होण्याच्या आधी सदर कर्मचाऱ्यास कंपनीच्या सेवेतून, इतर सेवेत जाण्याकरिता किंवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा असल्यास अथवा कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास, अशा कर्मचाऱ्याने बाल संगोपन रजा कालावधीमध्ये घेतलेल्या वेतनाइतके वेतन, कंपनीकडे जमा केल्यानंतरच अशा कर्मचाऱ्यास सेवेचा राजीनामा देता येईल किंवा सेवेतून कार्यमुक्त होता येईल. संबंधित कर्मचाऱ्याने तशा आशयाचे बंधपत्र (बॉंड) सदर रजेसाठी अर्ज करताना कार्यालयास न चुकता सादर करणे आवश्यक राहील.

(सतरा) सदरची रजा कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही.

४. अर्जित रजा मंजूर करण्याकरिता म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवाविनियम २००५ शी संलग्नित नववी अनुसूचीमध्ये विहित करण्यात आलेले सक्षम अधिकारी हे बाल संगोपन रजा मंजूर करण्यास सक्षम अधिकारी राहतील.

५. पत्नी असाध्य आजाराने अंथरुणास खिळलेली आहे अशा पुरुष कर्मचाऱ्यास त्याच्या मुलाच्या बालसंगोपनाच्या प्रयोजनासाठी बाल संगोपन रजा अनुज्ञेय करण्यासाठी, पत्नीच्या आजाराबद्दल, तसेच आजाराबद्दलच्या निकषाबाबत शासनाच्या धर्तीवर स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. तदनंतरच अशा पुरुष कर्मचाऱ्यास बाल संगोपन रजा विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करता येईल.

६. सदरची तरतूद या संदर्भात पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या तारखेपासून लागू करण्यात यावी.

७. सदर सुधारपत्र कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**